# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय (मपमविवि),

## मूर्तीजापूर रोड, कृषिनगर, अकोला-४४४१०४

जा. क्र. : पवैम-अकोला / सह. अधि. /1562/२०२६ दिनांक : 03/9/२०२६

## दरपत्रक मागविण्याची सूचना

विषय: कंत्राटी पद्धतीने वाचनालय, पशुपोषण शास्त्र विभाग, निम्न शिक्षण विभाग, पशुशल्यचिकित्सा व क्ष – किरण शास्त्र विभाग, अधिदान व लेखाधिकारी विभाग आणि मुलांचे वसतिगृह येथील दैनंदिन कामे कंत्राटी पद्धतीने करण्यासाठी सीलबंद दरपत्रक मागविणेबाबत......

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला अधिनस्त खालील विभागांतील दैनंदिन परीचरविषयक, वेळेवर उद्भवणारी, संबंधित अधिकाऱ्यांनी, वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली कामे खाली नमूद केलेल्या अटी-शर्तींच्या अधीन राहून कंत्राटी पद्धतीने प्रतिदिन आवश्यकतेनुसार (जास्तीत-जास्त आठ) मनुष्यबळ वापरून करवून घेण्याचे प्रस्तावित आहे:

१] वाचनालय
२] पशुपोषण शास्त्र विभाग
३] निम्न शिक्षण विभाग
४] पशु शल्यचिकित्सा व क्ष-किरण शास्त्र विभाग
५] अधिदान व लेखाधिकारी विभाग
६] मुलांचे वसतिगृह

अटी व शर्ती:

1. दर प्रती मजूर प्रती दिन प्रमाणे नमूद करावे.
2. स्थापित कंत्राट बुधवार, दिनांक १६.०९.२०२६ अथवा कार्यारंभ आदेश कंत्राटदाराने स्वीकृत केल्याचा दिनांक यापैकी जो उशिरा असेल अशा दिनांकापासून दिनांक १५.०९.२०२७ पर्यंत वैध राहील.
3. कंत्राटदाराला सूचनेत नमूद केलेली कामे केल्याबद्दल करण्यात येणाऱ्या मासिक देयकाचे भुगतान बँकेमार्फत करणे अनिवार्य असल्यामुळे कंत्राटदाराचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे; तसेच कंत्राटदाराकडे स्वतःचे पन कार्ड असणे आवश्यक आहे.
4. कंत्राटदाराला काम ठेक्याचा कालावधी संपण्यापूर्वी सोडायचे असल्यास त्याने एक महिना आधी आगाऊ सूचना देणे आवश्यक राहील. तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधित ठेकेदाराकडून एक महिन्याच्या वेतनाईतकी रक्कम वसूल करण्यात येईल.तसेच अशी व्यक्ती भविष्यात कामाचा ठेका देण्यास अपात्र ठरविली जाऊ शकेल .
5. स्थापित कंत्राट कोणतेही कारण न दाखविता केव्हाही रद्द करण्याचे अधिकार खालील सही करणारांनी राखून ठेवले आहेत.
6. सदर दरपत्रके बोलविण्याची सूचना कुठलीही पूर्वसूचना न देता रद्द करणे / त्यात आंशिक फेरबदल करणे या बाबतचे अधिकार खालील सही करणारांनी राखून ठेवले आहेत.
7. अधिनस्त मजुरांना मजुरी अदा करण्याची त्याचप्रमाणे अपघात विमा ,सेवाकर ,ईतर तत्सम बाबींची कार्यवाही करण्याची जबाबदारी पूर्णतः सेवापुरवठादाराची असेल व त्याने ही कार्यवाही महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ ,नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ,उर्जा व कामगार विभाग यांचेकडून वेळोवेळी निर्गमित विविध आदेश ,परीपत्रके ,अधिसूचना ,शासन निर्णय ,नियमावली ,इत्यादीच्या अधीन राहून करावी .असे विविध आदेश ,परीपत्रके ,अधिसूचना ,शासन निर्णय ,नियमावली ,इत्यादीची माहिती सेवापुरवठादराने स्वतः स्वक्रियाशिलतेणे करून घ्यावी. यासाठी महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.कामाचे ठिकाणी पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाचे जिविताच्या नुकसानीची जबाबदारी संपूर्णपणे संबंधित कंत्राटदाराची असेल व त्यासाठी हे महाविद्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. तसेच कामादरम्यान महाविद्यालयाच्या जैविक अजैविक-

मालमत्तेचे नुकसान झाल्यास सदर नुकसानीची जबाबदारी संपूर्णपणे संबंधित कंत्राटदाराची / मनुष्यबळाची असेल व त्यासाठीच्या नियमानुसार करावयाच्या नुकसान भरपाईसाठी सदर कंत्राटदार जबाबदार असेल.

8. मुलांचे वसतिगृह व पशुवैद्यकीय शल्यचिकित्सा व क्ष–किरण शास्त्र विभाग येथील सर्व बाबी ह्या जिवीताशी प्रत्यक्ष संबंधित असल्याने तसेच वाचनालय , पशुपोषण शास्त्र विभाग , निम्नशिक्षण विभाग व अधिदान व लेखाधिकारी विभाग येथील कामांचे महत्त्व लक्षात घेता ठरवून दिलेली तसेच अनुषंगिक कामे व महाविद्यालयाच्या मालमत्तेची देखरेख गांभिर्यपूर्वक करणे आवश्यक आहे.

9. दरपत्रक/ दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांना राहतील.

10. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर ठळक अक्षरांत 'दरपत्रक-मजूर कंत्राट' असे लिहावे.

11. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर या दरपत्रक मागविण्याच्या सूचनेचा क्रमांक संदर्भ क्रमांक म्हणून लिहावा.

12. सीलबंद दरपत्रके सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, कृषिनगर, अकोला-४४४१०४ या पत्यावर दिनांक ०९/०९/२०२६ च्या दुपारी ०३:०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

**सहयोगी अधिष्ठाता**
**पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय**
अकोला-४४४१०४

प्रत:

१] सूचना फलक – पवैम, अकोला / वाचनालय, पशुपोषण शास्त्र विभाग, निम्न शिक्षण विभाग, पशुशल्यचिकित्सा व क्ष–किरण शास्त्र विभाग, अधिदान व लेखाधिकारी विभाग आणि मुलांचे वसतिगृह, पवैम, अकोला

२] मा. सहयोगी अधिष्ठाता यांचे तांत्रिक अधिकारी, पवैम, अकोला यांनी सदर सूचना विस्तृत प्रसिद्धीसाठी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर तात्काळ प्रकाशित करण्यास्तव योग्य कार्यवाही करावी, ही विनंती.

फर्मचे नाव शिक्का

---

# <u>हमीपत्र</u>

मी / आम्ही निम्नस्वाक्षरीकार मे-------------------------- पत्ता----------------- हमीपत्र लिहून देतो कि, आपल्या कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात क्र.------------------------------------------ मध्ये नमूद साहित्य / सेवा_ पुरविण्याकरीता मी / आम्ही इच्छुक आहे / आहोत. सदर जाहिराती करीता मी / आम्ही फक्त एकच दरपत्रक / निविदा सादर केले आहेत. तसेच जाहिरात प्रसिद्ध करणाऱ्या कार्यालयाशी माझे कुठलेही हितसंबंध नाहीत.

फर्मचा सही व शिक्का